ePaper
छगन भुजबळ यांनी मंत्रीपदाचा राजीनामा देण्याची राधाकृष्ण विखे पाटील यांची मागणी



| वर्ष - 7 | अंक - 201 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत


- कांगारुचा थरारक विजय!
- 'मैं अटल हूँ'ची रिलीज डेट जाहीर!
- शालेय सुट्ट्यांवरून रंगलं राजकारण!
- तुम्ही गोट्या खेळत होता का?


www.mahaenews.com | बुधवार, दिनांक 29 नोव्हेंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# आता चाकणची हद्दवाढ होणार!

## स्थानिक आमदार दिलीप मोहिते पाटील यांची मागणी, अजित पवारांचा चाकणच्या हद्दवाढीसाठी पुढाकार

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुण्याच्या आजूबाजूला असणाऱ्या नगरपरिषद क्षेत्रातील लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. यामुळे नागरिकांना सोयीसुविधा देण्यात नगरपरिषदांना मर्यादा येत आहेत. चाकण शहर आणि परिसराची लोकसंख्याही मोठ्या प्रमाणात वाढली आहे. नागरिकांना चांगल्या पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी चाकणच्या हद्दवाढीचा प्रस्ताव सादर करा, अशा सूचना उपमुख्यमंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी दिल्या.**



उपमुख्यमंत्री पवार यांनी खेड-आळंदी विधानसभा मतदारसंघातील विविध विकासकामांबाबत मंत्रालयात आढावा बैठक घेतली. त्यामध्ये ही सूचना केली. चाकण शहराची हद्दवाढ करण्याची मागणी स्थानिक आमदार दिलीप मोहिते पाटील यांनी केली आहे. त्यावर हद्दवाढीचा प्रस्ताव सादर करण्याची सूचना पवार यांनी या वेळी केली.

चाकण एमआयडीसीकडे ४२ दशलक्ष लिटर (एमएलडी) पाण्याची मागणी येत आहे. परिसरातील सहा ग्रामपंचायतींना एमआयडीसीकडून पाणीपुरवठा होत असून ३० एमएलडी पाणी शिल्लक आहे. प्रस्तावित नवीन उद्योगांसाठी पाणी राखीव ठेऊन उर्वरित पाणी गावांत पिण्यासाठी द्यावे. चाकण, राजगुरुनगर आणि आळंदी या तिन्ही नगरपरिषदेचे घनकचरा संकलन प्रकल्प पूर्णतेच्या मार्गावर आहेत. यापुढे केवळ घनकचऱ्यावर प्रक्रिया न करता या प्रकल्पांमधून वीज, गॅस, बांधकामासाठीचे साहित्य यासारखे उत्पादन घेणारे प्रकल्प राबवावेत.

### चाकणच्या हद्दवाढीचा प्रस्ताव सादर करा

चाकण शहरातील विकासकामांचा आढावा घेताना उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, पुण्याच्या आजूबाजूला असणाऱ्या नगरपरिषद क्षेत्रातील लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. यामुळे नागरिकांना सोयीसुविधा देण्यात नगरपरिषदांना मर्यादा येत आहेत. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अखत्यारित येणाऱ्या चाकण, राजगुरूनगर, आळंदी येथील एमआयडीसीमधून १० रस्ते जातात, यापैकी तीन रस्ते मंजूर आहेत, तर चार रस्ते एमआयडीसी क्षेत्राबाहेरील असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. त्यावर उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, मावळ-खेड भागातील नागरिकांनी औद्योगिक क्षेत्रासाठी आपल्या जमिनी दिल्या आहेत. त्यामुळे या परिसरातील गावांमधील नागरिकांना चांगल्या सोयी देण्यासाठी एमआयडीसी क्षेत्राला जोडणारे रस्ते, पोहोच रस्ते सुस्थितीत असणे आवश्यक आहे. मुख्य रस्ते बनवितानाच पर्यायी रस्त्यांची दुरूस्ती करावी, त्यांची रूंदी वाढवावी. शेतकऱ्यांची मान्यता असल्यास पुणे चक्राकार रोड (रिंग रोड) तयार करताना मरकळ ते गोलेगावदरम्यान सर्विस रोड ९० मीटरऐवजी ११० मीटर करावा. त्यापुढे तो लोणीकंदपर्यंत वाढविण्याबाबत विचार करावा. त्यासाठी कराव्या लागणाऱ्या भूसंपादनास मान्यता देण्यात येईल.

# राष्ट्रपती आजपासून तीन दिवस पुणे दौऱ्यावर!

## विविध लष्करी संस्था, कृषी विद्यापीठाला भेट देणार; पुण्याहून नागपूरकडे रवाना होणार

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आजपासून (२९ नोव्हेंबर) तीन दिवस पुणे दौऱ्यावर येत आहेत. या दौऱ्यात राष्ट्रपती विविध लष्करी संस्था, कृषी विद्यापीठाला भेट देणार आहेत. दुपारच्या सुमारास लोहगाव विमानतळावर त्यांचे आगमन होणार आहे. त्यांच्या आगमनाला राज्यपाल रमेश बैस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार, दक्षिण मुख्यालयाचे अधिकारी, विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी यांच्यासह विविध अधिकारी उपस्थित राहणार आहेत. पुण्याहून राष्ट्रपती नागपूरकडे रवाना होणार आहेत.**



राष्ट्रपतींच्या पुणे दौऱ्यात राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी (एनडीए) आणि लष्करी वैद्यकीय महाविद्यालय (एएफएमसी), लोणावळा येथील नौदलाच्या आयएनएस शिवाजी अशा लष्कराच्या संस्थांमधील कार्यक्रमांमध्ये त्या सहभागी होणार आहेत. त्यानंतर लोणावळ्यातील नौदलाच्या आयएनएस शिवाजी संस्थेला त्या भेट देणार आहेत. तसेच लोणावळ्यातील कैवल्यधाम येथील योगसंस्थेत जाणार आहेत. त्यानंतर थेट एनडीए येथे त्यांचा मुक्काम असणार आहे. गुरुवारी (३० नोव्हेंबर) 'एनडीए'च्या १४५ व्या तुकडीच्या दीक्षान्त संचलन सोहळ्याला त्यांची उपस्थिती असणार असून, या वेळी स्नातकांच्या वतीने त्या मानवंदना स्वीकारणार आहेत.


त्यानंतर नगर जिल्ह्यातील राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठाला भेट देऊन पुण्यातील राजभवन येथे मुक्कामी येणार आहेत. १ डिसेंबर रोजी राष्ट्रपती मुर्मू राजभवन येथून वानवडी येथील लष्करी वैद्यकीय महाविद्यालयातील (एएफएमसी) कार्यक्रमास उपस्थित राहणार आहेत. या सोहळ्यानंतर दुपारी लोहगाव विमानतळावरून नागपूरकडे प्रयाण करणार आहेत.

### जिल्हा प्रशासनाची जय्यत तयारी

राष्ट्रपती मुर्मू यांच्या पुणे दौऱ्याची जय्यत तयारी जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आली आहे. राष्ट्रपती ज्या मार्गाने जाणार आहेत, त्या मार्गावर रंगीत तालीम करण्यात आली आहे. तसेच या मार्गावरील वाहतूक अन्य मार्गांनी वळविण्यात येणार आहे. संबंधित रस्त्यांची डागडुजी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करण्यात आली आहे.

# तीन डिसेंबरनंतर राज्यात दंगल!

## भुजबळांना तुरुंगातून बाहेर काढल; मात्र कधीच आभार मानले नाहीत : प्रकाश आंबेडकर




। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**राज्यात अनेक ठिकाणी दंगलग्रस्त परिस्थिती आहे. तीन डिसेंबरनंतर राज्यात दंगलीची मोठी शक्यता आहे. पोलीस ठाण्यांना सतर्कतेची सूचनाही देण्यात आली आहे. चार राज्यांतील विधानसभा निवडणुका झाल्यानंतर काहीही होऊ शकते, असे वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर मंगळवारी पत्रकार परिषदेत म्हणाले.**

महात्मा फुले पुण्यतिथीनिमित्त फुले वाड्यात येऊन आंबेडकर यांनी अभिवादन केले. त्यानंतर पत्रकारांशी त्यांनी संवाद साधला. देशात मुस्लिम आणि ओबीसी समाजाला लक्ष्य केले जात आहे. समाजात अशांतता निर्माण केली जात असून आंदोलनाशी संबंध नसलेल्यांचा त्यासाठी वापर केला जात आहे, असा आरोप करतानाच आगामी लोकसभा निवडणुकीनंतर नरेंद्र मोदी पंतप्रधानपदी राहणार नाहीत, असा दावाही आंबेडकर यांनी केला. ते म्हणाले की, तीन दिवसांपूर्वी मुस्लिम संघटनांची मुंबई येथे बैठक झाली. मुस्लिम संघटना आठ डिसेंबर रोजी पॅलेस्टाईन या विषयावर सभा घेणार आहेत. मुस्लिम समाजाची सभा असल्याने भाजप त्याकडे वेगळ्या नजरेने पहात आहे. अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांना कारागृहातून मीच बाहेर काढले. मात्र, त्यांनी त्याबाबत माझे कधी आभार मानले नाहीत. मलाही कोणाची गरज नाही. मंडल आयोगाचा इतिहास पाहिल्यावर वस्तुस्थिती कळेल. इतिहास पाहिला तर मीच ओबीसीचा जनक असल्याचे दिसेल, असेही आंबेडकर यांनी स्पष्ट केले. राज्याचे अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी दिल्लीतल्या महाराष्ट्र सदन घोटाळ्याप्रकरणी दोन वर्ष तुरुंगवास भोगला आहे. दिल्लीतलं महाराष्ट्र सदन बांधताना मोठा आर्थिक गैरव्यवहार केल्याप्रकरणी न्यायालयाने १४ मार्च २०१६ रोजी भुजबळ यांची तुरुंगात रवानगी केली होती. त्यानंतर दोन वर्षे त्यांनी मुंबईच्या आर्थर रोड तुरुंगात काढली. तुरुंगात असताना त्यांची प्रकृती खालावली होती. त्यानंतर काही महिने त्यांच्यावर मुंबईच्या केईएम रुग्णालयात उपचार करण्यात आले. याचदरम्यान, सर्वोच्च न्यायालयाने त्यांचा जामीन मंजूर केला. त्यानंतर रुग्णालयातून डिस्चार्ज घेऊन भुजबळ घरी परतले. दरम्यान, वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी दावा केला आहे की, त्यांनीच भुजबळांना तुरुंगाबाहेर काढलं. प्रकाश आंबेडकर मंगळवारी पुण्यात आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते. प्रकाश आंबेडकर यांनी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुण्यतिथीनिमित्त पुण्यातल्या फुले वाड्यात जाऊन त्यांना अभिवादन केलं. त्यानंतर त्यांनी पत्रकारांशी बातचीत केली. यावेळी ओबीसी आरक्षणावर बोलताना प्रकाश आंबेडकर म्हणाले, छगन भुजबळांची भूमिका मंडल आयोगाच्या विरोधात होती. म्हणून मी तुम्हाला (पत्रकार) सांगतोय की आधी इतिहास शोधा आणि तो लोकांसमोर आणा. वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर म्हणाले, ते न्यायाधीश त्यावेळी भुजबळांना तुरुंगाबाहेर सोडत नव्हते. न्यायपालिका त्यांचा जामीन नाकारत होती. त्यावेळी मीच उलटा वार केला होता. न्यायपालिका जर व्यवस्थित वागली नाही, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतरही भुजबळांबद्दलचा निर्णय घेतला नाही तर संबंधित न्यायाधीशावर खटला चालवता येऊ शकतो, हे लक्षात घ्यावं असं मीच बजावलं होतं. त्याच्या पुढच्या दिवशी भुजबळांना सोडून देण्यात आलं.

### न्यायाधीशाला शिव्या घातल्या नसत्या तर

» प्रकाश आंबेडकर यांच्या संविधान सन्मान महासभेतील वक्तव्यानंतर छगन भुजबळ प्रसारमाध्यमांसमोर म्हणाले होते की माझी प्रकाश आंबेडकरांबद्दल नाराजी नाही. त्यावर प्रकाश आंबेडकर म्हणाले, माझीही त्यांच्याबद्दल नाराजी नाही. उलट त्यांना तुरुंगातून बाहेर काढणारा मीच आहे. मी त्या न्यायाधीशाला शिव्या घातल्या नसत्या तर आज छगन भुजबळ तुरुंगातून बाहेर आले नसते. माझी भुजबळांवर नाराजी असती तर मी सार्वजनिकरित्या त्या न्यायाधीशाला (सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानंतर भुजबळांना तुरुंगातून सोडून देण्याबाबतचा निर्णय घेण्यास दिरंगाई करणारे न्यायाधीश) शिव्या घातल्या नसत्या.

# काही पिकांसाठी हसू तर काहीसाठी आंसू

## अवकाळी पावसाचा भात पिकाला झटका

। पुणे ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**अवकाळी पावसाने खरीप हंगामातील काढणीस आलेल्या भात पिकाला झटका बसला आणि भात खाचरांत पेरणी केलेल्या पिकांचे नुकसान झाले, तर रब्बी हंगामातील ज्वारी, हरभरा आणि गहू पिकाला जीवदान मिळाल्याने हा पाऊस म्हणजे आनंद, दुःखाचा खेळ झाल्याची अवस्था शेतकऱ्यांची झाली आहे. रविवारी (दि. 26) सायंकाळनंतर खेड तालुक्याच्या अनेक भागांत अवकाळी मुसळधार पाऊस झाला.**

पाऊस येण्याची शक्यता धरून भात उत्पादक शेतकऱ्यांनी शेतातील काढणीस आलेल्या पिकाच्या काढणीची घाई केली. काही शेतकऱ्यांनी भाताची झोडणी करून पेंढा शेतात ठेवला.



### अजूनही पावसाची शक्यता

» आंबोली, पाईट, शिरोली, चांदूस, संतोषनगर, पिंपरी, कोरेगाव, कुरकुंडी, करंजविहिरे, गोणवडी, अहिरे, चाकण एमआयडीसी भागातील गावे, शिवे, तळवडे, राक्षेवाडी, होलेवाडी, चांडोली आदी गावांच्या परिसरात जोरदार पाऊस झाला. तालुक्यात अजूनही ढगाळ वातावरण असल्याने पावसाची शक्यता आहे. सोयाबीन काढणीनंतर गहू, हरभरा या पिकांना झालेला पाऊस जीवदान देणारा समाधानकारक झाल्याचे वडगाव पाटोळे येथील शेतकरी किसन नेहेरे यांनी सांगितले.

रविवारी पाऊस अचानक सुरू झाला. भात काढून शेतात ठेवलेले पीक भिजल्याने मोठे नुकसान होण्याची शक्यता आहे.युरोपातून मागणी आहे. शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. भाताच्या पेंढ्यांचेही नुकसान झाले. अनेक ठिकाणी भात पिकात पाणी साचल्याने हातातोंडांशी आलेल्या पिकाचे नुकसान झाल्याने अनेक शेतकऱ्यांनी पिकांचे पंचनामे करून नुकसानभरपाईची मागणी केली.

आंबोली परिसरातील अनेक गावांत मुसळधार पाऊस झाल्याने भात खाचरे तुडुंब भरली आहेत. भात पिकांनंतर मसुरी, वाटाणा पेरणी केलेल्या पिकांचे त्यामुळे नुकसान होणार आहे. एकीकडे अवकाळी पावसाने भात पिकाला झटका बसला, तर दुसरीकडे रब्बी हंगामात पेरलेल्या गहू, ज्वारी, हरभरा या पिकांना या पावसाने दिलासा मिळाल्याने त्या शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. परंतु, ज्यांना पाणी नव्हते ते शेतकरी पावसाची वाट पाहत असताना अचानक पाऊस झाल्याने समाधानी आहेत.

# सुप्रिया सुळेंचे मुख्यमंत्र्यांना साकडे!

।पुणे ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

जिल्ह्यातील बारामती तालुका दुष्काळी म्हणून जाहीर करण्यात आला आहे. या तालुक्यासह बारामती लोकसभा मतदारसंघातील सर्व तालुक्यांत पाणीटंचाईच्या झळा बसण्यास सुरुवात झाली आहे. त्यामुळे या तालुक्यांत पाण्याची उपलब्धता होण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लक्ष घालून दुष्काळी बैठक घेण्याची मागणी खासदार सुप्रिया सुळे यांनी एक्स या समाजमाध्यमावरून केली आहे. ही मागणी करताना त्यांनी पालकमंत्री अजित पवार आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाही टॅग केले आहे. विशेष म्हणजे पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार आहेत. हा विषय पूर्णपणे पालकमंत्र्यांच्या अखत्यारीतील असल्याने या मुद्द्यावरून सुप्रिया सुळे-अजित पवार आमनेसामने येणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. गेल्या महिन्यात सर्व लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीत झालेल्या कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत पाण्याचे नियोजन करण्यात आले होते. त्यामध्ये पालकमंत्री पवार यांनी लोकप्रतिनिधी, जलसंपदा विभागाचे अधिकारी यांच्याशी सल्लामसलत करून पाण्याचे नियोजन केले आहे. यंदा पाऊस कमी झाला असल्याने पिण्याच्या पाण्याला प्राधान्य देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. त्यानुसार पुणे जिल्ह्यातही पाण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या बैठकीतही धरणांमधील उपलब्ध पाण्याचे नियोजन उन्हाळा संपेपर्यंत केले जाणार आहे.

# गॅस एजन्सीची पाऊण कोटींची फसवणूक!

## आरोपीला राजस्थान पोलिसांकडून अटक: फसवणुकीचे बिंग फुटताच कामगार गॅस शेगड्या चोरून झाला होता पसार

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**गॅस एजन्सीमध्ये काम करत असताना दोन कामगारांनी मिळून एजन्सीची तब्बल 70 लाख रुपयांची फसवणूक केल्याबाबत रावेत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. हा प्रकार 20 फेब्रुवारी 2021 ते 29 नोव्हेंबर 2022 या कालावधीत ओवी भारत गॅस एजन्सी, शिंदे वस्ती, रावेत येथे घडला. या गुन्ह्यातील एक आरोपी फसवणुकीचे बिंग फुटताच मूळ गावी राजस्थान येथे पळून गेला. तब्बल एक वर्षानंतर त्या आरोपीला पकडण्यात पोलिसांना यश आले आहे. शेतातील खोलीत बसलेल्या आरोपीला राजस्थान पोलिसांनी सापळा लावून अटक केली.**



श्रवणकुमार मोहनराम मांजु – बिष्णोई (वय 27, मूळ रा. मंडला काला, ता. देचू, जि. जोधपूर, राजस्थान) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी की, गॅस एजन्सीमध्ये अकाउंटंट म्हणून काम करणारी महिला कर्मचारी आणि गॅस डिलिव्हरी करण्याचे काम करणारा कामगार श्रमणकुमार मोहनराम मांजू यांनी संगनमत करून गॅस एजन्सीची तब्बल पाऊण कोटी रुपयांची फसवणूक केली.

ग्राहकांना नवीन कनेक्शन देणे, रेग्युलेटर देणे, सुरक्षा पाईप लायटरची विक्री केल्याचे पैसे ग्राहकांकडून थेट स्वतःच्या बँक खात्यावर घेऊन हे फसवणूक करण्यात आली आहे. चोरीचे बिंग फुटताच डिलिव्हरी बॉय श्रवण कुमार मोहनराम मांजू त्याच्या मूळ गावी मंडला कला, देचू, जोधपूर, राजस्थान येथे पळून गेला आहे. जाताना त्याने एजन्सीमधून 30 गॅस शेगड्या चोरून नेल्या.

निलेश डोके (वय 45, रा. तानाजी नगर, चिंचवडगाव) यांनी याप्रकरणी रावेत पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार महिला कर्मचारी आणि श्रवणकुमार यांच्या विरोधात भारतीय दंड विधान कलम 381, 408, 457, 201, 34 नुसार गुन्हा दाखल करण्यात आला.

आरोपी श्रवणकुमार मोहनराम मांजु हा फिर्यादी यांच्या गॅस एजन्सीमध्ये सिलेंडरची डिलिव्हरी देण्याचे काम करत होता. एजन्सीमधीAल दोन कर्मचारी महिलांना आपल्या कटात सामील करून श्रवणकुमार याच्या मदतीने फिर्यादी यांच्या गॅस एजन्सीच्या ग्राहकांकडून वेगवेगळ्या कारणांसाठी येणारे पैसे स्वतःच्या बँक खात्यावर घेतले.

ते पैसे दोघींनी आपसात वाटून घेतले. याप्रकरणी फिर्यादी यांनी पोलिसात तक्रार दिल्यानंतर दुसऱ्या कर्मचारी महिलेने तिच्या वाट्याला आलेले 12 लाख रुपये फिर्यादी यांना रोख स्वरूपात परत केले. पोलिसांनी दोघींचे बँक स्टेटमेंट काढले असता त्यात मोठ्या प्रमाणात आर्थिक देवाणघेवाण झाल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे संशयित व्यवहारांची चौकशी केली असता दोघींनी श्रवणकुमार याच्या मदतीने लाखो रुपयांची फसवणूक केल्यास उघड झाले. श्रवणकुमार मोहनराम मांजु याच्या वैयक्तिक बँक खात्यावर तब्बल 47 लाख रुपये गैरव्यवहाराची रक्कम जमा झाली आहे. त्यातील एकही रुपया त्याने फिर्यादींना यांना परत दिला नाही.

दरम्यान, आपले फसवणूक प्रकरण उघडकीस येणार असल्याचे समजताच महिला कर्मचाऱ्यांनी दुकानातील हिशोबाचे रजिस्टर जाळून पुरावा नष्ट करून त्या बदली दोघींनी हिशोबाचे नवीन रजिस्टर लिहून दुकानामध्ये ठेवले होते. 28 नोव्हेंबर 2022 रोजी श्रवणकुमार याने 30 स्टेनलेस स्टीलच्या शेगड्या चोरून शहरातून पळ काढला. त्याने 28 सिलेंडरचे पैसेही एजन्सीत जमा केले नव्हते.

### तांत्रिक बाबीच्या विश्लेषणाद्वारे आरोपींचा शोध

आरोपीच्या शोधत रावेत पोलिसांनी राजस्थान गाठले. मात्र रावेत पोलिसांना आरोपी मिळून आला नाही. तरी देखील रावेत पोलीस स्टेशन चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अमर वाघमोडे,तपासी अधिकारी प्राची तोडकर हे आरोपीच्या मागावर होते. खबऱ्यांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे तांत्रिक बाबीचे विश्लेषण करून आरोपीची संभाव्य लपण्याच्या ठिकाणांची माहिती रावेत पोलिसांनी राजस्थान येथील स्थानिक पोलिसांसोबत मिळून आरोपीचा माग काढला. सोमवारी (दि. 27 नोव्हेंबर 2023) राजस्थान मधील फलोदी जिल्हा पोलिसांनी आरोपी श्रवणकुमार मोहनराम मांजू याला अटक केली आहे.

### पोलिसांचे पथक जोधपूर येथे रवाना

**राजस्थान येथील फलोदी जिल्हा पोलीस अधीक्षक हनुमान प्रसाद मीना (I.P.S) यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभारी अधिकारी महेन्द्र सिरवी, पोलीस अंमलदार प्रदीप, सहीराम, हितेश, चौखाराम, गिरीराज, भगवानाराम, महेन्द्र उज्वल यांच्या पथकाने आरोपीस सापळा रचून पकडले. आरोपीचा ताबा घेण्यासाठी रावेत पोलिसांचे पथक जोधपूर येथे रवाना झाले आहे.**

---

# कविसंमेलन आणि प्रबोधनपर कार्यक्रमांनी संविधान दिन साजरा

## प्रा. प्रशांत मोरे, डॉ. विनायक पवार, शमिभा पाटील, डॉ. स्वप्नील चौधरी, प्रवीणकुमार यांचा सहभाग

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**संविधान दिनाच्या निमित्ताने संविधानाची जनजागृती व्हावी यासाठी महापालिकेच्या वतीने पिंपरी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याशेजारील मैदानात विविध प्रबोधनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. "आवाज संविधानाचा" या कविसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. या कविसंमेलनात प्रख्यात कवी प्रा. प्रशांत मोरे, डॉ. विनायक पवार, शमिभा पाटील, डॉ. स्वप्नील चौधरी, प्रवीणकुमार यांनी सहभाग घेतला.**



प्रा. प्रशांत मोरे यांनी 'आम्ही शिवाजीची तलवार, भीमाईची ललकार, क्रांतिवीराचे शूरवीर, शाहूबाची समता, गाडगेबाबांची एकता' ही कविता सादर करून सामाजिक सलोख्याचा संदेश देत महामानवांना जातीच्या विळख्यात वाटून न घेण्याचा संदेश दिला. तसेच त्यांनी 'राघू एकला राहीन, याद मैनेची येईन' ही एक प्रेमकहानी सांगणारी मार्मिक कविता सादर करून उपस्थितांची मने जिंकली. डॉ. विनायक पवार यांनी 'काय शिकलो असतो भीमा, तू शिकला नसता तर' ही कविता सादर करून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याची जाणीव करून दिली तर 'तू पाषाणाची ढाल, तू जीवाघावाने चाल, तू आभाळाची शान, तू धरतीवरून विशाल बा भीमा' ही कविता सादर करत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

शमिभा पाटील यांनी 'मिस्टर आंबेडकर तुम्ही जबरदस्त ग्रंथ लिहीलात' ही कविता सादर केली तर 'करता आलं तर एवढंच करा' ही राजकीय परिस्थितीवर भाष्य करणारी कविता सादर केली.

डॉ. स्वप्नील चौधरी यांनी कर्जबाजारी बापाच्या मुलाची व्यथा मांडणारी 'गण्या' नावाची कविता सादर करून उपस्थितांना भावूक केले. तर 'चला दंगल समजून घेऊ' या कवितेच्या माध्यमातून तरुणांना धर्माच्या नावाखाली भडकावणाऱ्यांना शाब्दिक चाबुक दिला.

प्रवीणकुमार यांनी 'संविधान आता जपा यार हो' ही कविता सादर करून भारतातील प्रत्येक नागरिकाने संविधानाचे महत्व समजून घेतले पाहिजे असा संदेश दिला तर 'फाटक्या जिंदगीला तू कोट दिला, तहानलेल्या पाखरांना तू घोट दिला' ही कविता सादर करून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महान कार्याला कवितेच्या माध्यमातून सलाम केला.

### प्रबोधनपर गीत गायनाचा कार्यक्रम

**या कविसंमेलनाचे निवेदन रोहित शिंगे आणि काजल कोथळीकर यांनी केले. दरम्यान, कविसंमेलनानंतर मंजुषा शिंदे, संजय गोळे आणि धीरज वानखेडे यांचा प्रबोधनपर गीत गायनाचा कार्यक्रम पार पडला. महाराष्ट्राचे ख्यातनाम लोकगायक मिलिंद शिंदे यांच्या बहारदार आवाजाने आणि संविधानावर आधारित प्रबोधनपर गीतांनी प्रेक्षकांची मने जिंकली आणि संविधानाचा जागर केला. अशा विविध कार्यक्रमांनी संविधान दिनानिमित्त आयोजित प्रबोधन पर्वातील दुसऱ्या दिवसाची सांगता झाली.**





# म. फुले आरक्षणाचे प्रश्न सोडवू शकतात!

**आजवर फुले, शाहू, आंबेडकरांच्या नावे केवळ राजकारणच झाले. तसे झाले नसते, तर आज समाज मूलभूत समस्यांवर मात करून पुढे जाऊ शकला असता. २८ नोव्हेंबर या महात्मा फुले यांच्या स्मृतिदिनाच्या पार्श्वभूमीवर आपण नेमके कुठे चुकलो, याचे पुनरावलोकन...**

महात्मा फुले यांचे विचार त्यांच्या मृत्यूनंतर सव्वाशे वर्षांनंतर ही कालबाह्य न होता आजही प्रस्तुत, नावीन्यपूर्ण, उपयुक्त आणि मार्गदर्शक आहेत. मात्र फुले, शाहू, आंबेडकरांच्या नावांचा वापर केवळ राजकारणासाठी केला गेला. त्यांचे विचार अंगिकारण्याचा, त्यांनी दाखविलेल्या वाटेवर चालण्याचा प्रयत्न झाला असता, तर आजचे शेती, सुशिक्षितांतील बेरोजगारी, आरक्षणावरून सुरू असलेले वाद, महिलांवरील अन्याय असे अनेक प्रश्न केव्हाच सुटले असते. ब्रिटिश सरकार शिक्षण कर घेत होते. पण शिक्षण सर्वांना दिले जात नव्हते. महात्मा फुले यांनी आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने स्त्रिया, शूद्रादिअतिशूद्र समाजातील मुली, मुले, प्रौढ अशा सर्वच घटकांसाठी शिक्षणाची वाट मोकळी केली. ब्रिटिशांनी आकारलेल्या कराविषयी महात्म फुले लिहितात-

राजे धर्मशील म्हणविती।  
आता का मागे घेती।  
विद्या द्यावी पट्टी पुरती।  
धिक्कारून सांगे जोती।।



आत्ता ही शिक्षणाची सरकारी व्यवस्था खासगीकरणाच्या माध्यमातून मोडकळीस आणली गेली आहे. अनेक शाळांमधून शिक्षक कमी आहेत. वर्षानुवर्षे नवीन शिक्षक नेमले जात नाहीत. अशारीतीने शिक्षणावरील खर्च कमी केला जातो, पण शिक्षणकर कमी झाला का? म्हणजे आजही पूर्ण शिक्षणकर शिक्षणावर खर्च केला जात नाहीच. सरकार स्वतःला धर्मशील म्हणवून घेत असले तरी सरकारचे धोरण न्याय्य असल्याचे दिसत नाही. शिक्षणाने वर्तनात सकारात्मक बदल होतो का? त्याला कौशल्यप्राप्ती होते का? तो कुटुंबीयांचा आधार होतो का? स्वतंत्र प्रज्ञेचा सुजाण नागरिक होतो का? असे अनेक प्रश्न आहेत. बेकारी वाढली आहे. त्याच बरोबर शेतातील कामे, कौशल्याची कामे करायला लोक मिळत नाहीत. हे ही शिक्षणाचेच प्रश्न आहेत ना? शिक्षणातून समाजातील, देशातील प्रश्नांची सोडवणूक करणारे मनुष्यबळ निर्माण होणे गरजेचे आहे. महात्मा फुले यांच्या काळात मुली, महिला यांच्यावर प्रचंड बंधने होती. त्यांचे मोठ्या प्रमाणावर शोषण होत असे.

शूद्रादिअतिशूद्रांचे प्रचंड शोषण होत असे. शेतकऱ्यांचीही स्थिती अतिशय दयनीय होती. सावकार, सरकार आणि धर्म यांच्या जाचामुळे दु:खी कष्टी झालेल्या या समाजघटकांची राजकीय आघाडी महात्मा फुले सुचवितात. आज लोकशाहीत अशी आघाडी यश मिळवू शकणार नाही काय? मुलींच्या शिक्षणाला विरोध करताना, मुलींचे मेंदू इवले- इवले, त्यांना शिक्षणाचा भार पेलणार नाही, असे म्हटले जाई, मात्र त्या पुरुषांहून अधिक सक्षम आहेत असे फुलेंचे म्हणणे होते. आता महिलांनी अनेक क्षेत्रे गाजवल्यानंतर तरी त्यांचे म्हणणे मान्य करायला हवे की नको? शहाणे, रास्त आणि न्यायी होण्यास एवढा विरोध का? अज्ञान, अंधश्रद्धा, सुविधांचा अभाव तसेच सरकार आणि धर्म व्यवस्था यातून प्रचंड शोषण झाल्याने शेतकरी आणि शेती व्यवसाय यांची फार वाईट स्थिती झाली होती. त्या परीस्थितीचा आणि त्यावरील उपाययोजनांचा उहापोह महात्मा फुले यांनी शेतकऱ्याचा असूड या आपल्या पुस्तकात केला आहे. त्या पुस्तकाचे सार्वजनिक वाचन बडोदा येथे महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या दरबारात तसेच अन्यत्रही झाले होते. त्यावर त्या काळातील विद्वानांच्या चर्चा झाल्या होत्या. त्या गोष्टी तशाच मोठ्या प्रमाणावर होत गेल्या असत्या तर आत्ताच्या काळात शेतीची स्थिती काय असती? पूर्वी कधीही नव्हती इतकी शेती अडचणीत आली आहे. कुटुंब चालवणे अशक्य होत आहे. म्हणून जगाचा पोशिंदा असलेला शेतकरी आत्महत्या करतो आहे. शेती करणाऱ्या मुलांची लग्ने वय उलटून गेले तरी, होत नाहीत. अनेकांना लग्नाचा विचार सोडून द्यावा लागला आहे. आपला वंश चालला पाहिजे ही सर्व सजीवांची नैसर्गिक प्रेरणा, भावना, अपेक्षा असते. एखाद्याचा वंश शेती केल्याने खंडीत होत असेल, तर त्याला व्यवस्था जबाबदार नाही काय? अनेक पालकांनी कष्ट करून आपल्या मुलांना शिकवले, त्यांची मुले उच्चशिक्षित झाली. अशा अनेकांना त्यांना साजेल, रुचेल, पटेल असे काम व्यवस्था देऊ शकली का?

## संपादकीय »

### शस्त्रविरामाची शहाणीव!

***इस्रायल आणि हमास यांच्यात गाझा संघर्षभूमीतील निर्धारित शस्त्रविरामाची मुदत सोमवार, २७ नोव्हेंबर रोजी संपुष्टात आली, पण इस्रायल आणि हमास यांनी या विरामास मुदतवाढीचे दार किलकिले ठेवले आहे.***

इस्रायल आणि हमास यांच्यात गाझा संघर्षभूमीतील निर्धारित शस्त्रविरामाची मुदत सोमवार, २७ नोव्हेंबर रोजी संपुष्टात आली, पण इस्रायल आणि हमास यांनी या विरामास मुदतवाढीचे दार किलकिले ठेवले आहे. तशी ती मिळेल, अशी आशा दोन्हींकडील मंडळींना वाटत होती हे महत्त्वाचे. त्यादृष्टीने दोन्ही बाजूंचे प्रयत्न सुरू होते. गत सप्ताहात शुक्रवारपासून शस्त्रविरामाची अंमलबजावणी सुरू झाली. शुक्रवार, शनिवार आणि रविवारी अनुक्रमे १३, १३ आणि १४ इस्रायली ओलिसांची सुटका हमासने केले. हमासच्या दहशतवाद्यांनी ७ ऑक्टोबर रोजी इस्रायलमधील काही स्थळांवर आणि एका सांगीतिक कार्यक्रमावर केलेल्या हल्ल्यात बाराशे जण ठार झाले होते. हमासने २४० इस्रायली आणि इतर देशीय नागरिकांना पळवून नेऊन ओलीस ठेवले.

**“तुमचे डोके दुखत आहे का? मग मिरची खा- म्हणजे तोंडात आग होईल आणि डोक्याकडे लक्ष जाणार नाही” – ही युक्ती राजकारण्यांनी महाराष्ट्रातल्या लोकजीवनात प्रत्यक्षात आणली आहे. यंदा पावसाळा कमी झाला आहे, धरणांच्या पाणी साठ्यासाठी आतापासून मारामाऱ्या सुरु होणार आहेत, अन्नधान्य उत्पादन कमी झाले आहे, आलेल्या उत्पादनाला भाव नाही, शेतकरी आत्महत्या सुरूच आहेत.**

# राजकारणाची वळणे आणि आरक्षणाची ‘मिरची’

नोकरदारांच्या समस्या आहेतच, लाचखोरी थांबण्याचे नाव घेत नाही, बेरोजगारी जैसे थे आहे, गुंतवणूक आली म्हणतात पण उद्योगधंदे काही उभे राहताना दिसत नाही, ह्या असंख्य अगणित समस्या आ वासून उभ्या असताना आणि तिथून सर्वसामान्यांचे लक्ष विचलित करण्यासाठी राजकारण्यांनी उभा केला आहे एकच प्रश्न तो म्हणजे आरक्षण. महाराष्ट्रात २०१९ साली निवडून आलेले आमदार, त्यांचे पक्षप्रमुख आणि संबंधित राजकीय नेते, पुढारी यांनी जसा महाराष्ट्रातील राजकारण आणि समाजकारणाचा पूर्ण चिखल करून ठेवला अगदी अक्षरशः तसाच चिखल मराठा आरक्षणाचाही केला आहे. काय शब्द द्यावा, कोणी द्यावा, काय निर्णय घ्यावा, कोणाला त्यात सहभागी करावे, कोणी बोलावे, कोणी बोलू नये कोणाचा पायपोस कोणाच्या पायात राहिलेला नाही. मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी यापूर्वीही लाखोंच्या संख्येने मोर्चे निघालेले आहेत




तेही अगदी शांततेने आणि कुठल्याही कायदा-सुव्यवस्थेला बाधा न पोहोचवता. मग आंतरवली सराटी या छोट्याश्या गावात उपोषणाला बसलेल्या आणि तोपर्यंत उर्वरित महाराष्ट्राला माहितीही नसलेल्या मनोज जरांगे यांचा पोलिसांना आणि साहजिकच सरकारलाही एव्हढा काय धोका जाणवला? त्यांचे आंदोलन संपविण्यासाठी पोलिसी बळाचा वापर का करावा लागला? कुठल्याही प्रश्नाचे काहीही उत्तर मिळत नाही. तेव्हाच्या घटनेमुळे आंदोलक आणि पोलीस दोघेही मोठ्या प्रमाणात जखमी झालेत. सर्वात महत्वाचे म्हणजे राज्यातल्या सामाजिक स्तरावर माणसांची मने कलुषित झालीत, भेदभाव उभे राहिलेत, जगण्याचे भान सुटून सामान्य माणूस बेभान झाला हे कधीही न भरून निघणारे नुकसान या प्रगतिशील राज्याचे झाले. म्हणूनच या घटनेला जबाबदार असलेल्या प्रत्येकाचा निषेध केलाच पाहिजे. त्यानंतरही शिस्तीत सुरू असलेल्या ह्या आंदोलनातील काही अतिउत्साही लोकांचा आता धीर सुटू लागला त्यातून या आंदोलनाला गालबोट लागते आहे. आंदोलनाबद्दल कोणी ‘ब्र’शब्द काढला की त्याची गाडी फोड, बंगला जाळ, सरकारी गाड्या मालमत्तांचे नुकसान कर असे हिंसक प्रकार घडू लागले आहेत. कधी नव्हे ते सर्व पक्षीय राजकीय नेते प्रचंड दबावाखाली आहेत आणि अशा हिंसक कारवायांमुळे त्यांना आंदोलनावर प्रश्न उपस्थित करण्याची, आंदोलन संपविण्याची आयती संधी मिळणार आहे. जरांगे म्हणतात की जाळपोळ, फोडाफोडी करणारे आंदोलक नाहीत, पुढारीच स्वतःहून आंदोलकांना आमच्या गाड्या फोडा असे सांगत आहेत.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।  
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।  
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# आतापर्यंत तुम्ही गोट्या खेळत होता का?

## संजय शिरसाट यांचा पृथ्वीराज चव्हाणांना सवाल

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मराठा आरक्षणाच्या मागणीवरून सरकारवर टीका करणाऱ्या माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांना शिंदे गटाचे आमदार संजय शिरसाट यांनी प्रत्युत्तर दिले आहे. राज्यात आमचे सरकार असते तर आत्तापर्यंत मराठा आरक्षणाचा मुद्दा मार्गी लावला असता, असे चव्हाण म्हणाले होते. त्यांच्या याच टीकेला उत्तर देतांना, "आतापर्यंत तुम्ही गोट्या खेळत होता का?," असा खोचक टोला शिरसाट यांनी चव्हाणांना लगावला आहे.**

पृथ्वीराज चव्हाणांच्या टीकेला उत्तर देतांना शिरसाट म्हणाले की, "मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी गेली 40 वर्षे मराठा समाज भांडत आहे. तेव्हा तुम्ही झोपले होते का? मुख्यमंत्री होते ना? आतापर्यंत तुम्ही गोट्या खेळत होते का? असे शिरसाट म्हणाले. तर, लखवा मारलेले मुख्यमंत्री असं शरद पवार तुम्हाला म्हणायचे, तुम्ही काय शिकवतायत. शिंदे सरकारच्या धास्तीमुळे हे पोपट आता बोलायला लागले असल्याचे देखील शिरसाट म्हणाले आहेत.

"मी मुख्यमंत्री असताना सहकार क्षेत्रात घेतलेल्या निर्णयामुळे 2014 मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसने आमचं सरकार पाडलं. जर त्यावेळी आमचं सरकार पडलं नसतं तर आम्ही नक्कीच मराठा आरक्षण टिकवलं असतं. मला खात्री आहे की माझं सरकार जर पडलं नसतं, तर आम्ही दोघे राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस आम्ही एकत्रित निवडणुकीला सामोरे गेलो असतो आणि 2014 मध्ये भाजपऐवजी आमचेच सरकार आले असते", असं



पृथ्वीराज चव्हाण म्हणाले. दरम्यान, उद्धव ठाकरे यांनी केलेल्या टीकेला देखील संजय शिरसाट यांनी उत्तर दिले आहे. "अडीच वर्षात घरात बसणारे आज मुख्यमंत्र्यांची लाज काढतायत हे दुर्दैव, हा मोठा विनोद आहे. अवकाळी पाऊस येणार म्हणजे छत्री धरायची होती का? , यांना शेतीतील काही कळत नाही. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कालच पंचनामे करण्याचे आदेश दिले आहेत. अनेक मंत्री आज बांधावर आहेत. एक दिवस आमचे मंत्री प्रचाराला गेले तर यांना त्रास होतो आणि हे अडीच वर्षात घरात बसले होते. यांना ना शेतकऱ्याचा कळवळा, ना आरक्षणाच्या प्रश्नावर घेणं देणं आहे. फक्त टोमणे मारणे हा तुमचा स्वभाव झाला आहे. मुख्यमंत्र्यांचा आदर करायला शिका, काम न करता लोकं आपल्या पाठीशी आहेत हे त्यांचं स्वप्न भंग होणार आहे. आगामी लोकसभा, विधानसभेत त्यांची जागा पहायला मिळेल, असेही शिरसाट म्हणाले. राज्यातील आमचं सरकार व्हीसीवर नाही, शेतात आहे. सर्वसामान्य शेतकऱ्यांना माहिती आहे की, सरकार आमच्या पाठीशी आहेत. आम्हाला आमच्या राज्याचा लावलौकीक देशात वाढवायचा आहे. चौकट तोडून आम्ही काय करू शकतो हे देशाने बघितले. पण, तुम्ही जे राज्य चालवले हे जनतेने बघितले आहे, असेही शिरसाट म्हणाले. मराठा कुणबी प्रमाणपत्र नोंदी शोधण्यासाठी सरकराने गठीत केलेली शिंदे समिती तत्काळ रद्द करण्याची मागणी ओबीसी नेते तथा अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी केली आहे. यावरून शिरसाट यांनी भुजबळ यांच्यावर निशाणा साधला आहे. शिंदे समितीबाबतचा निर्णय कॅबिनेटमध्ये झालेला आहे. त्याची अमलबजावणी शिंदे समिती करते आहे. त्यामुळे ही समिती बरखास्त करायची की नाही हे कॅबिनेट ठरवेल, मुख्यमंत्री निर्णय घेतील. त्यामुळे त्यांच्यासमोर मागणी करायची ना?, असा टोला शिरसाट यांनी भुजबळांना लगावला आहे.

### छगन भुजबळांवर निशाणा...

» सरकराने गठीत केलेली शिंदे समिती तत्काळ रद्द करण्याची मागणी ओबीसी नेते तथा अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी केली आहे. भुजबळ यांच्यावर निशाणा साधला आहे. शिंदे समितीबाबतचा निर्णय कॅबिनेटमध्ये झालेला आहे. त्याची अमलबजावणी शिंदे समिती करते आहे. त्यामुळे ही समिती बरखास्त करायची की नाही हे कॅबिनेट ठरवेल, मुख्यमंत्री निर्णय घेतील. त्यामुळे त्यांच्यासमोर मागणी करायची ना?, असा टोला शिरसाट यांनी भुजबळांना लगावला आहे. वाद पेटू नये या भूमीकेत सरकार आहे. जाती-जातीत भांडण होऊ नये या भूमिकेत सरकार काम करते आहे. सरकार अलर्ट मोडमध्ये आहे. कोणत्याही समजाचे घटक दंगल करणाच्या प्रयत्न करणारे असतील, तर त्यांना रोखल्याशिवाय राहणार नाही मग तो कोणीही असेल, असेही शिरसाट म्हणाले.

# सकल धनगर समाज आरक्षणासाठी चक्का जाम!

## छ. संभाजीनगर-जळगाव महामार्गावर रास्ता रोको आंदोलन

। हिंगोली ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**सिल्लोड तालुक्यातील सकल धनगर समाजाच्या वतीने धनगर आरक्षणासाठी मंगळवारी शहरातील पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर चौकात रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. त्यावेळी तहसीलदार यांना विविध मांगण्याचे निवेदन देण्यात आले. आंदोलकांच्या वतीने जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. यावेळी मोठ्या प्रमाणात धनगर समाज बांधव उपस्थित होते. दोन्ही बाजूला वाहनांच्या लांब रांगा लागल्या होत्या.**

मागील आठ दिवसांपासून छत्रपती संभाजीनगर येथे धनगर आरक्षणासाठी आमरण उपोषण सुरू आहे. मात्र, प्रशासनाकडून दखल न घेतल्याने या उपोषण



आंदोलनाचे पडसाद आता तालुक्यामध्ये गावोगावी उमटू लागले आहेत. शासनाकडून या आंदोलनाची दखल न घेतल्यास उग्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्याचा येईल, असा इशारा धनगर समाजाकडून देण्यात आला. तसेच घटनेमध्ये असलेल्या धनगर समाजाच्या एसटी आरक्षणाची त्वरित अंमलबजावणी करण्यात यावी, अशीही मागणी करण्यात आली आहे. यावेळी प्रभत जरारे, नगरसेवक सुनील दुधे, नागराध्यक्ष पांडुरंग दुधे, जय मल्हार सेना जिल्हा चिटणीस श्रावण मामा हासे यांनी मनोगत व्यक्त करुन शासना विरोधात संताप व्यक्त केला. यावेळी दिगंबर गोरे, सदाशिव फुले, सरपंच निवृत्ती वरपे, ॲड. प्रमोद राऊत, काशिनाथ फुले, प्रभाकर पांढरे, कारभारी गुंजाळ, मधू हासे, सोमीनाथ गोरे, गजानन भावले, स्वप्नील गुंजाळ, राजू राऊत, हरी दुधे, सरपंच नानाभाऊ पांढरे, तुळशीराम सागरे, रामदास दुधे, बाजीराव दुधे, सोमीनाथ गोरे, राजू राऊत, भाऊलाल सुरे, समाधान फुले, डॉ. सूर्यवंशी, कचरू वाणी सरपंच, प्रल्हाद भावले, गजानन भावले, डॉ. वरपे, दिलीप जरारे, परभत जरारे, जनार्दन जरारे, टेकचंद, दुधे, अर्जुन संधर, धनसिंग दुधे, ईश्वर दुधे, विलास सपकाळ राजू गुंजाळ, रंगनाथ राऊत, एकनाथ राऊत, गजानन निवडे, रवी पांढरे आदीसह समाजबंधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. सिल्लोड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक विजयसिंग राजपूत, सहायक पोलीस निक्षक चातुरे, पोलीस उपनिरीक्षक आपसाहेब झिंझुर्डे, पोलीस पंडित फुले, रामानंद बुधवत, तळेकर, परमेश्वर शिंदे यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता. धनगर समाजाच्या एसटी आरक्षण अंमलबजावणीचा प्रस्ताव राज्य सरकारने केंद्र सरकारकडे पाठवून अंमलबावणी करावी, राजे यशवंतराव होळकर घरकुल योजना व अहिल्यादेवी होळकर महामेष योजनेच्या लाभार्थ्यांना निधी त्वरित वितरण करावे, घोषणा केलेल्या निधीची तरतूद करावी, समाज्याच्या प्रश्नावर आंदोलन केलेल्या आंदोलकांवरील गुन्हे मागे घेण्यात यावीत, आरक्षणासाठी आत्महत्या केलेल्या बिरू खर्जे कुटुंबीयांना २५ लाख तत्काळ मदत द्यावी, या मागण्यासाठी जत तहसील कार्यालयासमोर अशोक गोरड यांनी सोमवारपासून आमरण उपोषण सुरू केले आहे.

### आंदोलनस्थळी अभ्यास समितीची होळी

» आंदोलनस्थळी दुसऱ्या दिवशी राज्य सरकारने धनगर आरक्षणासाठी नेमलेल्या समितीच्या शासन आदेशाची होळी करण्यात आली. धनगर समाजाच्या आरक्षणावरून राज्य शासनाने समिती नेमून धनगर समाजाची दिशाभूल केली आहे. याच्या निषेधार्थ आंदोलनस्थळी समितीच्या शासन आदेशाची होळी करण्यात आली.मागील आठ दिवसांपासून छत्रपती संभाजीनगर येथे धनगर आरक्षणासाठी आमरण उपोषण सुरू आहे. मात्र, प्रशासनाकडून दखल न घेतल्याने या उपोषण आंदोलनाचे पडसाद आता तालुक्यामध्ये गावोगावी उमटू लागले आहेत.

# शालेय सुट्ट्यांवरून रंगलं राजकारण!

## बिहारमध्ये सुट्या कमी केल्याचा विरोधकांचा आरोप!

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**नितीश कुमार यांच्या नेतृत्वाखालील सरकारने २०२४ साठी दोन शालेय कॅलेंडर जारी केले आहे. यामुळे, बिहारमध्ये वाद निर्माण झाला आहे. उर्दू माध्यम शाळा आणि इतर माध्यमातील शाळांसाठी स्वतंत्र सुट्ट्यांची यादी तयार केल्याने भाजपाने बिहार राज्य सरकारवर खरपूस टीका केला आहे बिहार राज्याच्या शिक्षण विभागाने जारी केलेल्या कॅलेंडरनुसार २०२४ मध्ये शिवरात्री, जन्माष्टमी, रक्षाबंधन, हरतालिका आणि जितिया (जीवितपुत्रिका व्रत) यांसारख्या सणांना सुट्टी मिळणार नाही.**



तर, उर्दू माध्यमांच्या शाळांना ईद-उल-फित्र आणि ईद-उल-अधा (बकरीद) साठी तीन दिवसांची सुट्टी देण्यात आली आहे. परंतु, उर्दू माध्यम नसलेल्या शाळांना दोन्ही ईदच्या सणांना फक्त एक दिवस सुट्टी असेल. या मुद्द्यावर प्रतिक्रिया देताना सुशील मोदी यांनी एएनआय या वृत्तसंस्थेला सांगितले की, "नितीश कुमार यांच्या नेतृत्वाखालील बिहार सरकारने हिंदूविरोधी चेहरा दाखवून हिंदूंच्या भावना दुखावणारा निर्णय घेतला आहे. हिंदूंच्या सणांच्या सुट्ट्यांमध्ये कपात करण्यात आली आहे. मुस्लिम सणांच्या सुट्ट्या वाढवल्या आहेत. केंद्रीय मंत्री गिरीराज सिंह म्हणाले की, "इस्लामिक रिपब्लिक ऑफ बिहार. नितीश आणि लालू सरकारने शाळांमध्ये मुस्लिम सणांच्या सुट्ट्या वाढवल्या पण हिंदू सणांच्या सुट्ट्या संपवल्या. लालू यादव आणि नितीश सरकार ज्या प्रकारे हिंदूंवर हल्ले करत आहेत, भविष्यात ते मोहम्मद नितीश आणि मोहम्मद लालू म्हणून ओळखले जातील", त्यांनी X वर लिहिले. राज्याच्या शिक्षण विभागाने २७ नोव्हेंबर रोजी उर्दू माध्यमाच्या शाळा आणि उर्दू माध्यम नसलेल्या शाळांसाठी कॅलेंडर जारी केले. राज्याच्या शिक्षण विभागाच्या म्हणण्यानुसार, शिक्षणाच्या अधिकारांतर्गत किमान २२० अध्यापन दिवस सुनिश्चित करून हे कॅलेंडर तयार करण्यात आले. उर्दू माध्यमांच्या शाळांमध्ये दर शुक्रवारी सुट्टी असेल आणि मोहरमसाठी दोन दिवसांची सुट्टी देण्यात आली आहे. मात्र, उर्दू माध्यम नसलेल्या शाळांना ही केवळ एक दिवसाची सुट्टी आहे. दिवाळीसाठी एक दिवस, होळीसाठी दोन दिवस आणि दुर्गापूजा आणि छठपूजेसाठी प्रत्येकी तीन दिवस सुट्टी असते.

यंदाच्या शाळेच्या कॅलेंडरमध्ये हरतालिकेला दोन दिवस आणि जितियाला एक दिवस सुट्टी होती. मात्र, या सुट्ट्या २०२४ मध्ये मिळणार नाहीत. तसेच, बिहारच्या शिक्षण विभागाने उर्दू माध्यमाच्या शाळा आणि उर्दू नसलेल्या शाळांसाठी स्वतंत्रपणे दोन कॅलेंडर जारी करण्याची ही पहिलीच वेळ आहे.

### शाळांमध्ये दर शुक्रवारी सुट्टी

» राज्याच्या शिक्षण विभागाने २७ नोव्हेंबर रोजी उर्दू माध्यमाच्या शाळा आणि उर्दू माध्यम नसलेल्या शाळांसाठी कॅलेंडर जारी केले. राज्याच्या शिक्षण विभागाच्या म्हणण्यानुसार, शिक्षणाच्या अधिकारांतर्गत किमान २२० अध्यापन दिवस सुनिश्चित करून हे कॅलेंडर तयार करण्यात आले. उर्दू माध्यमांच्या शाळांमध्ये दर शुक्रवारी सुट्टी असेल आणि मोहरमसाठी दोन दिवसांची सुट्टी देण्यात आली आहे. मात्र, उर्दू माध्यम नसलेल्या शाळांना ही केवळ एक दिवसाची सुट्टी आहे. दिवाळीसाठी एक दिवस, होळीसाठी दोन दिवस आणि दुर्गापूजा आणि छठपूजेसाठी प्रत्येकी तीन दिवस सुट्टी असते. केंद्रीय मंत्री गिरीराज सिंह म्हणाले की, "इस्लामिक रिपब्लिक ऑफ बिहार. नितीश आणि लालू सरकारने शाळांमध्ये मुस्लिम सणांच्या सुट्ट्या वाढवल्या पण हिंदू सणांच्या सुट्ट्या संपवल्या. लालू यादव आणि नितीश सरकार ज्या प्रकारे हिंदूंवर हल्ले करत आहेत, भविष्यात ते मोहम्मद नितीश आणि मोहम्मद लालू म्हणून ओळखले जातील.

# राहुल तुम्ही वयाची पन्नाशी ओलांडली!

## असदुद्दीन ओवेसींनी उडवली खिल्ली

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**तेलंगणामधील निवडणूक प्रचार शिगेला पोहोचला आहे. ३० नोव्हेंबर रोजी येथे मतदान प्रक्रिया पार पडणार असल्याने प्रचार अंतिम टप्प्यात पोहोचला आहे. तसंच, विरोधक -सत्ताधारीही आमने सामने आले आहेत. येथे भाजपा, काँग्रेस आणि बीआरएस अशी तिहेरी लढत आहे. तर, एआयएमआयएमनेही उमेदवार उभे केले आहेत. यावरून काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी बीआरएस आणि एआयएमआयएम वर सडकून टीका केली होती. त्यावर एआयएमआयएमचे अध्यक्ष असदुद्दीन ओवेसी यांनी पलटवार केला आहे.**



२५ नोव्हेंबर रोजी तेलंगणातील जाहीर सभांना संबोधित करताना राहुल गांधी यांनी सत्ताधारी भारत राष्ट्र समिती (BRS) आणि AIMIM वर जोरदार टीका केली होती. हे दोन्ही पक्ष केंद्र सरकारला सहकार्य करत असल्याचं राहुल गांधींनी म्हटलं होतं. "मोदीजी के है दो यार, ओवेसी और केसीआर (पीएम मोदींचे दोन मित्र आहेत – ओवेसी आणि केसीआर)", असं राहुल गांधी म्हणाले होते. "केसीआर यांना मोदींनी पंतप्रधान व्हावे आणि मोदींना केसीआर मुख्यमंत्री व्हावेत, अशी इच्छा आहे" असं राहुल गांधी पुढे म्हणाले होते. राहुल गांधींच्या या टीकेवर असदुद्दीन ओवेसी यांनी प्रत्युत्तर दिलं आहे. "राहुल गांधी, बोलण्यापूर्वी विचार करा. तुम्ही पन्नाशी ओलांडली आहात. एकटेपणामुळे तुम्ही त्रासला असाल. हा तुमचा निर्णय आहे. आम्हाला कोणाच्याही आयुष्यात ढवळाढवळ करायची नाही. आम्ही कोणाला त्रास देत नाही, पण जर कोणी आम्हाला छेडले तर आम्ही शांत बसत नाही", अशा इशारा असदुद्दीन ओवेसी यांनी राहुल गांधींना दिला. तेलंगणातील बीआरएस आणि केंद्रातील नरेंद्र मोदी यांचे सरकार हटवण्यासाठी काँग्रेस प्रयत्न करत आहे. काँग्रेस हा जुना पक्ष असून आगामी तेलंगणा निवडणुकीत प्रचंड बहुमताने विजयी होईल, असाही विश्वास राहुल गांधींनी व्यक्त केला होता. तेलंगणा ११९ जागांसाठी ३० नोव्हेंबर रोजी विधानसभा निवडणूक होत आहे. तेलंगणा, छत्तीसगड, मिझोराम, मध्य प्रदेश आणि राजस्थानसह ३ डिसेंबरला निकाल जाहीर होतील.तेलंगणामधील निवडणूक प्रचार शिगेला पोहोचला आहे. ३० नोव्हेंबर रोजी येथे मतदान प्रक्रिया पार पडणार असल्याने प्रचार अंतिम टप्प्यात पोहोचला आहे. तसंच, विरोधक -सत्ताधारीही आमने सामने आले आहेत. येथे भाजपा, काँग्रेस आणि बीआरएस अशी तिहेरी लढत आहे. तर, एआयएमआयएमनेही उमेदवार उभे केले आहेत. यावरून काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी बीआरएस आणि एआयएमआयएम वर सडकून टीका केली होती. त्यावर एआयएमआयएमचे अध्यक्ष असदुद्दीन ओवेसी यांनी पलटवार केला आहे.

# 17 दिवसांनी 41 कामगार बाहेर येणार

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

उत्तराखंडमधील उत्तरकाशी इथं बोगद्यात अडकलेल्या मजुरांची अखेर सुटका होत आहे. रेस्क्यू ऑपरेशनचं काम अंतिम टप्प्यात आलं आहे. गेल्या 12 नोव्हेंबरपासून म्हणजेच 17 दिवसांपासून तब्बल 41 मजूर बोगद्यात अडकून पडले होते. तेव्हापासून या मजुरांच्या सुटकेसाठी दिवसरात्र रेस्क्यू ऑपरेशन सुरु आहे. उत्तरकाशीतील सिल्क्यारा बोगद्यात 41 कामगार अडकल्याने देशासह जगाच्या नजरा या रेस्क्यू ऑपरेशनकडे लागल्या. 41 मजुरांना बाहेर काढल्यानंतर त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात येईल. त्यासाठी रुग्णवाहिका पाठवण्यात आल्या आहेत. 41 मजुरांसाठी 41 बेड तयार करण्यात आले. या मजुरांच्या सुटकेसाठी बोगद्यात 800 मिमी व्यासाची पाईप सोडण्यात आली. या पाईपमधून NDRF ची टीम मजुरांपर्यंत पोहोचली. या पाईपद्वारेच मजुरांच्या सुटकेचे प्रयत्न करण्यात आले. उत्तरकाशी टनेल रेस्क्यू ऑपरेशन मागील 16 दिवसांपासून सुरु आहे. देशभरात दिवाळी सुर असताना दिवाळीच्या पहिल्या दिवशी माती कोसळून 41 मजूर बोगद्यामध्ये अडकले. तेव्हापासून म्हणजे 12 नोव्हेंबरपासून हे बचावकार्य सुरु आहे. आज या बचावकार्याचा 17 वा दिवस आहे.उत्तरकाशी जिल्हा मुख्यालयापासून 30 किमी अंतरावर बोगद्याचं काम सुरु आहे. केंद्र सरकारची महत्त्वकांक्षी चारधाम ऑल वेदर सडक सिल्कियारा ही योजना सुरु आहे. या प्रकल्पामुळे कोणत्याही ऋतुमध्ये, कोणत्याही वातावरणात रस्ते वाहतूक करता येणार आहे. ब्रह्मखाल-यमुनोत्री राष्ट्रीय राज्यमार्गावरील या बोगद्याचं काम सुरु आहे. हा बोगदा 4.5 किमी लांब आहे.

# नाटू नाटू गाण्यावर थिरकले स्टार मायकेल डग्लस!

हॉलिवूड स्टार मायकेल डग्लस यांनी गोव्यातील 54व्या भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाला (IFFI) हजेरी लावली. यंदा इफ्फीमध्ये सत्यजित रे लाइफटाइम अचीवमेंट पुरस्कार मायकेल डग्लस यांना प्रदान करण्यात आला. इफ्फीचा मंचावर मायकेल डग्लस यांनी आरआरआर (RRR) या चित्रपटातील नाटू नाटू या गाण्यावर डान्स देखील केला. तसेच यावेळी मायकेल यांनी भारतीय चित्रपटसृष्टीचे कौतुक देखील केलं. आरआरआर चित्रपटाबद्दल मायकेल डग्लस म्हणाले, 'हे विलक्षण होते, त्यांनी संगीतासाठी ऑस्कर जिंकले. ते आश्चर्यकारक होते. सध्या भारतीय चित्रपटसृष्टीसाठी खूप चांगला काळ आहे." 54 व्या भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या पत्रकार परिषदेत मायकेल डग्लस म्हणाले "या महोत्सवाचे सौंदर्य म्हणजे तुम्ही 78 परदेशी देशांचे प्रतिनिधित्व केले. मला वाटते की, भारत हा सध्या खूप चांगल्या हातात आहे." "मला वाटतं की, अनुराग ठाकूर आणि पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वाखाली गेल्या काही वर्षांत चित्रपटांच्या निर्मितीसाठी आणि वित्तपुरवठा करण्यासाठी अधिक पैसा लावण्यात येत आहे, हे आम्ही बघत आहोत.", असंही मायकेल डग्लस यांनी सांगितलं. मायकेल डग्लस यांची पत्नी कॅथरीन झेटा-जोन्स आणि मुलगा डिलन डग्लस यांनी देखील 54 व्या भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात हजेरी लावली होती. मायकेल डग्लस, कॅथरीन झेटा-जोन्स आणि डिलन डग्लस यांचे इफ्फीच्या रेड कार्पेटवरील फोटो आणि व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. या फोटो आणि व्हिडीओमध्ये मायकेल डग्लस हे प्रिंटेड कोट आणि ब्लॅक गॉगल अशा लूकमध्ये दिसले तर कॅथरीन झेटा-जोन्स या ब्लू ड्रेसमध्ये दिसल्या.

# 'मैं अटल हूँ' सिनेमाची रिलीज डेट जाहीर!

मनोरंजनसृष्टीतील लोकप्रिय अभिनेते आहेत. प्रत्येक सिनेमात त्याने आपल्या अभिनयाची झलक दाखवली आहे. आता पुन्हा एकदा सिनेमागृहात धमाका करण्यासाठी पंकज त्रिपाठी सज्ज आहेत. 'मैं अटल हूँ' (MAIN ATAL HOON) या सिनेमाच्या माध्यमातून ते प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहेत. आता या सिनेमाची रिलीज डेटही समोर आली आहे.

देशाचे माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांच्या आयुष्यावर आधारित हा सिनेमा आहे. या सिनेमात पंकज त्रिपाठी अटल बिहारी वाजपेयी यांच्या भूमिकेत दिसणार आहे. अटल बिहारी वाजपेयी यांचा कवी ते राजकारणी नेता होण्यापर्यंतचा प्रवास या सिनेमात दाखवला जाणार आहे. पंकज त्रिपाठी यांनी सोशल मीडियावर 'मैं अटल हूँ' या सिनेमाचं एक पोस्टर शेअर केलं आहे. या पोस्टरमध्ये ते अटल बिहारी वाजपेयी यांच्या भूमिकेत दिसत आहे. पोस्टर शेअर करत त्यांनी लिहिलं आहे,"एक कवी ज्यांनी इतिहास पुन्हा लिहिला". 'मैं अटल हूँ' हा सिनेमा 19 जानेवारी 2024 रोजी सिनेमागृहात प्रदर्शित होणार आहे". या पोस्टरवर 'हार्ट ऑफ स्टोन...मॅन ऑफ स्टील' असं लिहिलेलं दिसत आहे. 'मैं अटल हूँ' या सिनेमाच्या दिग्दर्शनाची धुरा रवी जाधव (RAVI JADHAV) यांनी सांभाळली आहे. तर ऋषी विरमानी आणि रवी जाधव यांनी या सिनेमाचं कथानक लिहिलं आहे.



# मी जेव्हा पहिल्यांदा व्हिडीओ पाहिला


दाक्षिणात्य अभिनेत्री रश्मिका मंदाना सध्या तिच्या आगामी 'ॲनिमल' या चित्रपटामुळे चांगलीच चर्चेत आहे. या चित्रपटात रश्मिका पहिल्यांदाच अभिनेता रणबीर कपूरबरोबर झळकणार आहे. १ डिसेंबरला 'ॲनिमल' चित्रपट प्रदर्शित होणार आहे. त्यामुळे या चित्रपटाची टीम ठिकठिकाणी प्रमोशन करताना दिसत आहे. अशातच सध्या रश्मिकाचा एक व्हिडीओ व्हायरल झाला आहे. ज्यामध्ये अभिनेत्री डीपफेक व्हिडीओविषयी बोलताना दिसत आहे. अभिनेत्री रश्मिका मंदाना आणि रणबीर कपूर 'ॲनिमल' चित्रपटाचं सध्या हैदराबादमध्ये प्रमोशन करत आहेत. या प्रमोशन दरम्यानचा रश्मिकाचा हा व्हिडीओ आहे. ज्यामध्ये तिला डीपफेक व्हिडीओविषयी विचारलं जातं. तेव्हा रश्मिका म्हणते, "मी जेव्हा पहिल्यांदा डीपफेक व्हिडीओ पाहिला तेव्हा मी खूप घाबरले होते. मला वाटलं माझ्या टीमकडून मला कुठलाही पाठिंबा मिळणार नाही. सर्वात पहिल्यांदा पाठिंबा देणारे व्यक्ती अमिताभ बच्चन होते. त्यानंतर अनेक जण मला पाठिंबा देण्यासाठी पुढे सरसावले. सुरुवातीला डीपफेक व्हिडीओचा माझ्यावर खूप परिणाम झाला. हा डीपफेक सर्वसाधारण व्हिडीओ नसतो त्यामुळे मी यावर बोलण्याचा निर्णय घेतला." पुढे रश्मिका म्हणाली, "मी जगभरातल्या सर्व मुलींना सांगू इच्छिते की, हे सामान्य नाहीये. जर एखाद्या गोष्टीचा तुमच्यावर परिणाम होतोय तर गप्प बसण्याची गरज नाही. तुम्ही त्यावर प्रतिक्रिया देऊ शकता आणि लोकं तुम्हाला पाठिंबा देतील. आपण जिथे राहत आहोत तो एक चांगला देश आहे." दरम्यान, रश्मिका मंदानानंतर, कतरिना कैफ आणि काजोलाचा डीपफेक व्हिडीओ व्हायरल झाला होता.

# मी तुझ्याशी आता वाद घालणार नाही

अभिनेत्री कतरिना कैफच्या 'टायगर 3' या चित्रपटामधील टॉवेल सीनची चर्चा सोशल मीडियावर गेल्या काही दिवसांपासून सुरु आहे. हा फाईट सीन प्रेक्षकांना खूप आवडला. आता या 'टॉवेल फाईट' सीनवर कतरिनाचा पती विकी कौशलनं प्रतिक्रिया दिली आहे. एका मुलाखतीमध्ये विकीला कतरिनाच्या टायगर-3 चित्रपटामधील 'टॉवेल फाईट' सीनबाबत विचारण्यात आलं. यावेळी विकी म्हणाला, "मी चित्रपटाच्या स्क्रिनिंगसाठी गेलो होतो आणि आम्ही दोघे चित्रपट पाहत होतो. साहजिकच जेव्हा हा सीन आला तेव्हा तो सीन बघतनाता मी तिच्याकडे झुकलो आणि म्हणालो, मी तुझ्याशी पुन्हा कधीच वाद घालणार नाही. कारण टॉवेल घालून तू मला असे मारावे, असे मला वाटत नाही." पुढे विकी म्हणाला, "तिने घेतलेल्या कठोर परिश्रमांचा मला खरोखर अभिमान वाटतो. तिचे काम पाहणे खूप प्रेरणादायी आहे." कतरिनाच्या टायगर 3 या चित्रपटाला प्रेक्षकांची पसंती मिळाली. ओपनिंग-डेला या चित्रपटानं 44.5 कोटींची कमाई केली. या चित्रपटात कतरिनासोबतच सलमान खान आणि इमरान हाशमी यांनी देखील प्रमुख भूमिका साकारली आहे. मनीष शर्माने (MANISH SHARMA) या चित्रपटाची दिग्दर्शनाची धुरा सांभाळली आहे.शाहरुख खान आणि हृतिक रोशन यांचा कॅमिओ देखील चित्रपटात आहे. विकी हा सध्या त्याच्या 'सॅम बहादूर' या आगामी चित्रपटामुळे चर्चेत आहे. हा चित्रपट 1 डिसेंबरला थिएटरमध्ये रिलीज होण्यासाठी सज्ज आहे. विक्की कौशल व्यतिरिक्त नीरज काबी, एडवर्ड सोनेनब्लिक, रिचर्ड भक्ती क्लेन, साकिब अयुब आणि कृष्णकांत सिंह बुंदेला हे कलाकार देखील या चित्रपटात महत्त्वाच्या भूमिकेत आहेत. या चित्रपटात विकी हा फिल्ड मार्शल सॅम माणेकशॉ यांची भूमिका साकारताना दिसणार आहे. तर सान्या मल्होत्रानं या चित्रपटात सॅम माणेकशॉ यांच्या पत्नी सिल्लू माणेकशॉ यांची भूमिका साकारली आहे. या चित्रपटात फातिमा सना शेखनं इंदिरा गांधी यांची भूमिका साकारली आहे.

# कुटुंबाच्या पाठिंब्यामुळेच अभिनय क्षेत्रात

सामाजिक व इतर नवनवीन विषयांवर चित्रपट तयार झालेले आहेत. गोवन चित्रपट निर्मिती चांगल्या पद्धतीने होत आहे. फक्त हे चित्रपट गोमंतकियांनी आवर्जून पाहणे गरजेचे आहे. (IFFI 2023) तरच गोव्यातील चित्रपट संस्कृतीचा उत्कर्ष अधिक जोमाने होईल, असा विश्वास 'क्रेझी मोगी' या चित्रपटातील नवअभिनेत्री शेफाली नाईक हिने दै. 'पुढारी'शी बोलताना व्यक्त केला. इफ्फीतील विशेष विभागात निर्माता क्रिस्त सिल्वा यांच्या 'क्रेझी मोगी' या चित्रपटाचे नुकतेच प्रदर्शन झाले. निवडक सात कोकणी चित्रपट दाखवण्यात आले. त्यात 'क्रेझी मोगी' या चित्रपटाचा समावेश होता. वळवई-सावईवेरे येथील शेफाली कला अकादमी गोवा कॉलेज ऑफ थिएटर्स आर्टस्च्या अंतिम वर्षात शिकत आहे. वयाच्या तिसऱ्या वर्षापासून तिने आतापर्यंत २५ हून अधिक नाटकांत काम केले आहे. आतापर्यंत तिला अनेक पुरस्कार मिळाले आहेत. तिच्याशी साधलेला संवाद... सोफिया नावाची भूमिका मी साकारली आहे. सोफिया ही श्रीमंत घराण्यातील मुलगी दाखवली आहे. तिच्यात असलेला स्वार्थीपणा तिच्या नात्यांवर कसा परिणाम करतो हे दाखवण्यात आले आहे. प्रेम हे संपत्ती पाहून होत नसते. ती एक भावना आहे. मात्र याच भावनेला तडा देण्याचे काम सोफियाकडून होते. प्रथमच चित्रपटात काम करण्याची संधी मिळाल्याने खूप आनंद वाटला. माझी आई रेश्मा नाईक ही नाट्य कलाकार आहे. तिच्यापासून मला प्रेरणा मिळाली. माझे वडील संदीप नाईक हे व्यावसायिक असून त्यांचाही मला खूप पाठिंबा आहे. सावर्डे-कुडचडे येथील प्रसिद्ध ज्येष्ठ रंगकर्मी वासंती कारापूरकर ही माझी आजी आहे. आजोबा रामेश्वर शेट हे नाट्यप्रयोगांत संगीत वाद्यवृंदात काम करायचे. त्यामुळे लहानपणापासूनच नाट्यकलेचे बाळकडू मला मिळत गेले. मलाही कला क्षेत्रातच करिअरची आवड असल्यामुळे हे सहज शक्य झाले. माझे शिक्षण जीव्हीएम हायस्कूल, सावईवेरे येथे झाले. हो, सोफिया ही व्यक्तिरेखा साकारताना खूप कष्ट घ्यावे लागले. सोफिया ही ख्रिश्चन आहे. त्यामुळे ख्रिश्चन समाजात ज्या पद्धतीने भाषा बोलली जाते. ती मी शिकले. माझ्या अनेक मैत्रिणी ख्रिश्चन असल्याने मला त्यांनी खूप सहकार्य केले. मला फक्त सराव करावा लागला. यासाठी मला सुमारे आठ ते दहा दिवस लागले. निश्चितच ही भूमिका आव्हानात्मक असल्यामुळे दडपण वाढले होते. मात्र नंतर ते सरावाने कमी झाले. एखाद्या गोष्टीची आवड असेल तरच ते सहज शक्य होते. चित्रपटातील एका प्रसंगात फार आव्हान असल्यासारखे वाटले. ख्रिश्चन नववधूचा पोशाख हा खूप जड असतो. मेकअप करतानाही खूप वेळ लागायचा. मात्र इफ्फीत रेडकार्पेटवर चालताना कष्टाचे सोने झाल्यासारखे वाटले. अजूनही मला या क्षेत्रात पुढे जायचे आहे.



# कांगारूचा थरारक विजय!

## मॅक्सवेलच्या वादळात भारतीय गोलंदाजांचा पालापाचोळा

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**ग्लेन मॅक्सवेलच्या वादळी शतकाच्या बळावर ऑस्ट्रेलियाने भारताचा पाच विकेटने पराभव केला. या विजयासह ऑस्ट्रेलियाने मालिकेत 2-1 ने कमबॅक केलेय. भारताने दिलेल्या 223 धावांचे आव्हान ऑस्ट्रेलियाने अखेरच्या चेंडूवर 5 विकेट राखून पूर्ण केले. ग्लेन मॅक्सवेलने 48 चेंडूत 104 धावांचा पाऊस पाडला. मॅक्सवेलच्या वादळी शतकामुळे ऋतुराज गायकवाडचे शतक व्यर्थ ठरले.**

ग्लेन मॅक्सवेलच्या वादळामध्ये भारतीय गोलंदाजांचा पालापाचोळा झाला. एकाही गोलंदाजाला भेदक मारा करता आला नाही. रवि बिश्नोई याचा अपवाद वगळता एकाही गोलंदाजाला धावगतीला आवर घालता आली नाही. मॅक्सवेलच्या शतकामुळेच ऑस्ट्रेलियाने अशक्यप्राय विजय मिळवला. ऑस्ट्रेलियाला अखेरच्या 48 चेंडूत 102 धावांची गरज होती. मॅक्सवेलने भारतीय गोलंदाजांचा खरपूस समाचार घेत ऑस्ट्रेलियाला विजय मिळवून दिला. ग्लेन मॅक्सवेल याने 48 चेंडूत नाबाद 104 धावांची खेळी केली. मॅक्सवेलने अखेरच्या षटकात 23 धावा वसूल करत ऑस्ट्रेलियाला विजय मिळवून दिला. मॅक्सवेलने 48 चेंडूत 216 च्या स्ट्राईक रेटने 104 धावा केल्या. यामध्ये आठ गगनचुंबी षटकारांचा समावेश होता. त्याशिवाय त्याने आठ खणखणीत चौकारही लगावले. मॅक्सवेल आणि मॅथ्यू वेड यांनी सहाव्या विकेटसाठी 40 चेंडूत 91 धावांची अभेद्य भागिदारी केली. यामध्ये मॅक्सवेलने 57 धावा चोपल्या तर मॅथ्यू वेड याने 28 धावांचे योगदान दिले. मॅक्सवेलने



स्टॉयनिसोबत 60 धावांची भागिदारी केली. मॅक्सवेलच्या शतकाच्या बळावर ऑस्ट्रेलियाने मालिकेतील आव्हान जिवंत ठेवलेय. ऑस्ट्रेलियाकडून ट्रेविस हेड याने 18 चेंडूत 35 धावांचे योगदान दिले. यामध्ये त्याने आठ चौकार ठोकले. त्याशिवाय एरॉन हार्डे याने 12 चेंडूत तीन चौकारांच्या मदतीने 16 धावा केल्या. जोस इंग्लिश याने 6 चेंडूत दहा धावा केल्या. मार्कस स्टॉयनिस याने 21 चेंडूत 17 धावा केल्या. टीम डेविडला खातेही उघडता आले नाही. मॅथ्यू वेड याने 16 चेंडूत तीन चौकार आणि एका षटकाराच्या मदतीने 28 धावांचे योगदान दिले. भारताकडून रवि बिश्नोई सर्वात यशस्वी गोलंदाज ठरला. त्याने 4 षटकात 32 धावांच्या मोबदल्यात दोन विकेट घेतल्या. प्रसिध कृष्णा याने महागडी गोलंदाजी केली.

### ऑस्ट्रेलियाचे मालिकेतील आव्हान जिवंत

» ग्लेन मॅक्सवेल याने 48 चेंडूत नाबाद 104 धावांची खेळी केली. मॅक्सवेलने अखेरच्या षटकात 23 धावा वसूल करत ऑस्ट्रेलियाला विजय मिळवून दिला. मॅक्सवेलने 48 चेंडूत 216 च्या स्ट्राईक रेटने 104 धावा केल्या. यामध्ये आठ गगनचुंबी षटकारांचा समावेश होता. त्याशिवाय त्याने आठ खणखणीत चौकारही लगावले. मॅक्सवेल आणि मॅथ्यू वेड यांनी सहाव्या विकेटसाठी 40 चेंडूत 91 धावांची अभेद्य भागिदारी केली. यामध्ये मॅक्सवेलने 57 धावा चोपल्या तर मॅथ्यू वेड याने 28 धावांचे योगदान दिले. मॅक्सवेलने स्टॉयनिसोबत 60 धावांची भागिदारी केली. मॅक्सवेलच्या शतकाच्या बळावर ऑस्ट्रेलियाने मालिकेतील आव्हान जिवंत ठेवलेय.

त्याने चार षटकात 68 धावा खर्च केल्या. अर्शदीप सिंह याने 4 षटकात 44 धावा खर्च करत एक विकेट घेतली. आवेश खान आणि अक्षर पटेल यांनी चार षटकात प्रत्येकी 37 धावा खर्च करत एक एक विकेट घेतली. दरम्यान, भारताने प्रथम फलंदाजी करताना 223 धावांचा डोंगर उभारला होता. यामध्ये ऋतुराज गायकवाड याने नाबाद 123 धावांची खेळी केली होती. मॅक्सवेलच्या शतकी खेळीमुळे ऋतुराजचे शतक पाण्यात गेले.ग्लेन मॅक्सवेलच्या वादळामध्ये भारतीय गोलंदाजांचा पालापाचोळा झाला. एकाही गोलंदाजाला भेदक मारा करता आला नाही. अखेरच्या 48 चेंडूत 102 धावांची गरज होती. मॅक्सवेलने भारतीय गोलंदाजांचा खरपूस समाचार घेत ऑस्ट्रेलियाला विजय मिळवून दिला.

# जसप्रीत बुमराह मुंबई इंडियन्स सोडणार?

## सोशल मीडियावर एमआयला केले 'अनफॉलो', इन्स्टा स्टोरी व्हायरल

।नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारताचा स्टार अष्टपैलू खेळाडू हार्दिक पंड्या मुंबई इंडियन्समध्ये परतला आहे. पंड्या गुजरात टायटन्सचा कर्णधार होता, पण तो आता आगामी हंगामात मुंबई इंडियन्ससाठी खेळताना दिसणार आहे. अशा परिस्थितीत आता शुबमन गिलला गुजरातचा कर्णधार नियुक्त केले आहे. या सगळ्यात आता मुंबई इंडियन्सचा स्टार गोलंदाज जसप्रीत बुमराहने ट्विटर आणि इन्स्टाग्रामवर मुंबई इंडियन्सला अनफॉलो केले आहे. चर्चांना उधान आले आहे. चाहते सर्व प्रकारचे अनुमान लावत आहेत, चाहत्यांना असे वाटते की बुमराह आणि मुंबई इंडियन्समध्ये सर्व काही ठीक नाही.**





टीम इंडियाचा वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहने आपल्या इन्स्टा स्टोरीद्वारे खळबळ उडवून दिली आहे. त्यांच्या या स्टोरीनंतर सोशल मीडियावर सर्व प्रकारच्या अटकळांना सुरुवात झाली आहे. वास्तविक, बुमराहने त्याच्या इन्स्टा स्टोरीवर एका पोस्टद्वारे लिहिले आहे की, कधीकधी शांत राहणे हे देखील चांगले उत्तर असते. बूम-बूमच्या या स्टोरीने चाहत्यांना गोंधळात टाकले आहे. कारण ही स्टोरी कोणासाठी आहे किंवा तो कोणावर नाराज आहे, हे स्पष्ट झाले नाही. जसप्रीत बुमराहने ट्विटर आणि इन्स्टाग्राम या दोन्ही सोशल मीडिया हँडलवरून बुमराहला अनफॉलो केले आहे. बुमराहने त्याच्या इन्स्टाग्राम अकाऊंटवर एक स्टोरी पोस्ट केली आहे, ज्यामध्ये 'सायलेन्स इज समटाइम्स द बेस्ट आन्सर' असे लिहिले आहे. याचा अर्थ असा की कधीकधी एखाद्या प्रश्नाचे सर्वोत्तम उत्तर म्हणजे शांत राहणे. यावरून बुमराहच्या मनात बरेच काही सुरू असल्याचे स्पष्ट झाले आहे. बुमराह जबरदस्तीने गप्प राहण्याचा प्रयत्न करत आहे. हार्दिक पंड्याचे मुंबई इंडियन्समध्ये पुनरागमन झाल्यामुळे बुमराह खूश नसल्याचा अंदाज सोशल मीडियावर लावला जात आहे. त्यामुळे जसप्रीत बुमराहने मुंबई इंडियन्सला अनफॉलो केले आहे. जसप्रीत बुमराहच्या या इन्स्टा स्टोरीने अटकळांचा बाजार चांगलाच तापवला आहे आणि

### बुमराहच्या मनात बरेच काही

» जसप्रीत बुमराहने ट्विटर आणि इन्स्टाग्राम या दोन्ही सोशल मीडिया हँडलवरून बुमराहला अनफॉलो केले आहे. बुमराहने त्याच्या इन्स्टाग्राम अकाऊंटवर एक स्टोरी पोस्ट केली आहे, ज्यामध्ये 'सायलेन्स इज समटाइम्स द बेस्ट आन्सर' असे लिहिले आहे. याचा अर्थ असा की कधीकधी एखाद्या प्रश्नाचे सर्वोत्तम उत्तर म्हणजे शांत राहणे. यावरून बुमराहच्या मनात बरेच काही सुरू असल्याचे स्पष्ट झाले आहे. बुमराह जबरदस्तीने गप्प राहण्याचा प्रयत्न करत आहे. हार्दिक पंड्याचे मुंबई इंडियन्समध्ये पुनरागमन झाल्यामुळे बुमराह खूश नसल्याचा अंदाज सोशल मीडियावर लावला जात आहे. त्यामुळे जसप्रीत बुमराहने मुंबई इंडियन्सला अनफॉलो केले आहे.

सर्वात चर्चेत असलेली गोष्ट म्हणजे बुमराह मुंबई इंडियन्सवर नाराज आहे. हार्दिक पांड्या मुंबई इंडियन्समध्ये परतल्याने बुमराह नाराज आहे आणि आता तो फ्रेंचायझी सोडू शकतो. बुमराहने इन्स्टा आणि ट्विटरवरून मुंबई इंडियन्सला अनफॉलो केल्यामुळेही हे अटकळ बांधले जात आहेत. तसेच त्याने एमएस धोनीला फॉलो करायला सुरुवात केली आहे. बुमराहने आणखी एक स्टोरी पोस्ट केली आहे, ज्यामध्ये असे लिहिले आहे की, 'एखाद्या गोष्टीबद्दल लोभी असणे ही चांगली गोष्ट आहे, परंतु एकनिष्ठ असणे ही चांगली गोष्ट नाही.' बुमराहची ही पोस्ट बरेच काही सांगून जाते. कोणत्याही निर्णयावर बुमराह खूश नाही. अशा परिस्थितीत जसप्रीत बुमराह मुंबई इंडियन्स सोडू शकतो, अशीही शक्यता वर्तवली जात आहे.